स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**संदर्भ : रासेयो /२०२५/ ५२४** **महत्त्वाचे आणि तातडीचे** **दि. १७/०२/२०२५**

प्रति
मा. प्राचार्य
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
संलग्न महाविद्यालये आणि परिसंस्था
पुणे शहर व पिंपरी चिंचवड
पुणे

**विषय :- छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित पदयात्रेत सहभागी विद्यार्थ्यांची यादी पाठविणेबाबत....**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न राष्ट्रीय सेवा योजने द्वारे महाविद्यालयांनी सर्व महापुरुषांची जयंती महाविद्यालयामार्फत साजरी करणे राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक उपक्रमांतर्गत कार्यक्रमाचा भाग म्हणून आवश्यक आहे. केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सकाळी ८.३० वाजता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मैदानापासून फर्ग्युसन महाविद्यालय या दरम्यान 'जय शिवाजी, जय भारत' मेगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले असून हा दुग्धशर्करा योग आहे. या उपक्रमामध्ये संलग्न महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी आणि कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी सहभागी होणे अनिवार्य आहे.

आपणास सूचित करण्यात येत की आज दि. १७/०२/२०२५ रोजी साय. ५.०० वाजेपर्यंत संबंधित सहभागी होणाऱ्या विध्यार्थी, कार्यक्रम अधिकारी व विध्यार्थी कल्याण अधिकारी यांची यादी bsd@unipune.ac.in व nss_student_list@pun.unipune.ac.in या मेल वर पाठवण्यात यावी. सदर सहभागी विद्यार्थ्यांची यादी सहसंचालक उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत महाराष्ट्र शासनाच्या माहितीस्तव कळवण्यात येणार आहे. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**विद्यार्थी विकास मंडळ**

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**